# प्रेस नोट

## जिल्हा परिषद पदभरती सन-2023-24 बाबत महत्त्वाची सुचना

बिगर पेसा जिल्हा परिषदेकरीता आरोग्य सेवक (महिला) तसेच कंत्राटी ग्रामसेवक या पदांकरीता उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा दिनांक 16 जुन 2024 ते 21 जुन 2024 या कालावधीमध्ये घेण्यात येणार आहे. तरी सदर संवर्गांकरीता अर्ज केलेल्या महिला उमेदवारांनी त्यांच्या पहिल्या, मधल्या किंवा शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल तर अशा महिला उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर जातांना मूळ राजपत्रित अधिसूचना किंवा मुळ विवाह प्रमाणपत्र प्रस्तुत केले तरच त्यांना परिक्षेसाठी प्रवेश देण्यांत येईल, ज्या महिला उमेदवारांचे नावात विवाहानंतर बदल झाला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. परिक्षा केंद्रावर प्रवेशाकरीता अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो,ओळखपत्र जसे पैन कार्ड (Pan Card)/ पारपत्र (Passport) वाहन चालक परवाना (Driving Licence)/ मतदार ओळखपत्र (Voter ID)/ आधार कार्ड, बँक पोस्ट फोटोसहीतचे पासबुक ,नोंदणीकृत विद्यापीठ / कॉलेज चे ओळखपत्र/ बार कॉन्सिलचे ओळखपत्र हे केंद्रावरील समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करावे लागेल. त्यामुळे उमेदवारांचे प्रवेशपत्रावरील नाव व लग्नानंतरचे नाव यामध्ये तफावत असल्यास त्याबाबत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे परिक्षा केंद्रावर पुरावा सादर केला नसल्यास त्यांचे परिक्षा केंद्रावरील प्रवेशाकरीता संबंधित ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच विवाहीत महिला उमेदवारांचे बाबतीत प्रवेशपत्रा (Hallticket) वर लग्नापूर्वीचे नाव असेल व पॅन कार्ड वर लग्नानंतरचे नाव व वडिलांचे पूर्ण नाव असले तरी सदर पॅनकार्ड ओळखपत्र म्हणून ग्राहय धरले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अशा परिस्थितीत संबंधित उमेदवारांना मूळ विवाहप्रमाणपत्र किंवा नावांत बदल केल्याबाबतची राजपत्रित अधिसूचना सादर करणे अनिवार्य राहील.

**त्यामुळे उमेदवारांना याद्वारे आवाहन करण्यांत येते की, ओळखपत्रावरील नाव व प्रवेशपत्रावरील नाव हे सारखे असेल असे ओळखपत्र परिक्षा केंद्रावर परिक्षेचे वेळेस सादर करावे.** तसेच परिक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यात आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवाराचे केंद्रावरील प्रवेश नाकारण्यांत येईल. रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना हे ओळखपत्र म्हणून ग्राहय धरता येणार नाही. तेव्हा जाहिरात व प्रवेशपत्र यातील सर्व सुचनांचे बारकाईने अबलोकन करुनच उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.

दिनांक : 14.06.2024
ठिकाण: गडचिरोली

**(आयुषी सिंह, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी
गडचिरोली

वरिल प्रेसनोट प्रसिद्ध वृत्तपत्रात प्रसिद्ध करावे.

**(आयुषी सिंह, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, गडचिरोली**